# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

**जाहिरात क्रमांक २०११/आस्था/कक्ष-१/सिआर-४, दिनांक-२५/०४/२०११**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं/प्रानिम/२००७/प्र.क्र४६/०७/१३अ दिनांक १९.१०.२००७ व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक/असंक/१०१०/प्र.क्र१/२०१०/वित्तीय सुधारणा-१ दिनांक ०५ जून २०१० व वित्त विभाग शासन निर्णय क्रं/पदनि-२०१०/प्र.क्र८३/१० वित्तीय सुधारण-१ दिनांक २९.११.२०१० मधील सूचनेनूसार, तलाठी संवर्गातील पदांना पदभरती निर्बंधामधून वगळल्यामूळे जिल्हाधिकारी, लातूर यांचे आस्थापनेवर **गट क** मधील **तलाठी** पदांसाठी खालील नमुद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**तलाठी संवर्गात रिक्त पदांचे आरक्षण :-**

**(वेतन बँड पीबी-१ रू.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रू.२४००)** ***(एकुण पदे -५८ )***

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **१** | **अनु.जाती** | **४** | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **२** |
| **२** | **अनु. जमाती** | **३** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| **३** | **वि.जा.अ** | **४** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **२** |
| **४** | **भ.ज-ड** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **२** |
| **५** | **इ.मा.व** | **९** | **३** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **३** |
| **६** | **खुला** | **३५** | **११** | **२** | **०** | **२** | **२** | **१** | **१७** |
| | **एकुण** | **५८** | **१७** | **४** | **१** | **४** | **४** | **१** | **२७** |

**टिपः-**

१)जनगणना कर्मचारी, स्वातंत्र सैनिकाचे पाल्य, उमेदवारांना पसंतीक्रमानूसार प्राधान्य देण्यात येईल.

२)भुकंपग्रस्त व प्रकल्प ग्रस्त उमेदवारांना अर्ज करतांना अर्जासोबत प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

३)३० टक्के महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या- त्या प्रवर्गातील पुरूष उमेदवारांमधुन पदे भरण्यात येतील.

४)माजी सैनिक आरक्षणा अंतर्गत उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या- त्या संवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधुन पदे भरण्यात येतील.

५)पदांचे एकुण संवर्गनिहाय संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

६) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग पत्र दि.२६.०८.२०१० व अंशकालीन उमेदवारास शासन निर्णय दि.२७.१०.२००९ अन्वये देऊ केलेले समांतर आरक्षण हे त्यास शासकीय नोकरी मिळवण्यास साहयभूत ठरावे हया उद्येशाने दिलेले आहे. उमेदवारांनी एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला आहे, त्याच उमेदवारास पून्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२९.०५.२०१० अन्वये अंशकालीन उमेदवारांना (कमाल ५ टक्केच्या मर्यादेत ) गुण देण्याची सवलत रद्य करण्यात आलेली आहे.

**१) शैक्षणीक अर्हताः** १.शासन महसूल व वन विभाग, अधिसुचना दिनांक १ जूलै २०१० अन्वये संविधानीक विद्यापिठाची पदवी तसेच शासनाने त्यांच्याशी समतूल्य केलेली अन्य अर्हता

२)संगणकः- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्रक्र ६१/२००१/३९ दि.१९ मार्च , २००३ मधील सूचनेनूसार नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना संगणकअर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

## २) वयोमर्यादा :-

१) **दिनांक १६/०५/२०११ रोजी किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्षे वयोमर्यादा (मागासवर्गीयांसाठी ५वर्षांची शिथीलता) तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रकाप्रमाणे राहील**.

२) माजी सैनिकांसाठी/भुकंपग्रस्त/प्रक्रल्पग्रस्त उमेदवारांसाठी शासन निर्णयानूसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

३) १९९१ चे जनगणना कर्मचारी / स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य /१९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारां करिता शासन निर्णय दिनांक ०६.१०.२०१० मधील तरतूदीनूसार ४५ वर्ष वयाची अट राहील.

४) अंशकालीन उमेदवारासाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ मधील तरतूदीनूसार ४६ वर्ष वयाची अट राहील.

५) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दि.३०.०४.२००५ मधील तरतुदीनूसार खेळाडू उमेदवारांना वयोमर्यादेबाबत निर्णय घेण्यात येईल.

## ३) इतर अटी व शर्ती :-

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२) उक्त पदांसाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणाऱ्या संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करू शकेल.

३) मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालावधीत सक्षम अधिकारी,उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र, असणे आवश्यक राहील. निवड होणाऱ्या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कडून जात वैधता प्रमाणपत्र, सादर केल्या नंतरच नियुक्ती दिली जाईल.

४) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती वगळुन अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी सन २०१०-११ या वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्राची अर्जासोबत साक्षांकीत प्रत जोडावी. नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील.

५) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक अनियो/१०/०५/१२६/सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यांनतर निवड होणाऱ्या उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना सध्या अस्तीत्वात असलेली निवृती वेतना ऐवजी **नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना** लागु राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

६) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन परिपत्रक दि.१/७/२००५ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

७) उमेदवारांनी उक्त पदांसाठी आवश्यक अर्हतेनूसार शैक्षणिक प्रमाणपत्रे, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रीमीलेअर प्रमाणपत्र इत्यादीच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात **मुळ प्रती जोडू नयेत**.

८) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत जोडावी.

९) एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रीयेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतीम निर्णय इत्यादीबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती / नियुक्ती प्राधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१०) जाहिरातीत नमुद केलेली पदे ही डिसेंबर २०११ अखेर पर्यत रिक्त होणारी पदे समाविष्ट केली असून निवड केलेल्या उमेदवारांना जशी पदे रिक्त होतील त्यापमाणे नियुक्त्या देण्यात येईल.

११) शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमूखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

## ४) <u>माजी सैनिक उमेदवारांसाठी</u> : - .

१) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग दि.१०/१०/१९८० व दिनांक १६/०४/१९८१ नूसार माजी सैनिक म्हणुन शासन सेवेकरिता पात्र उमेदवार असावा.

## ५) <u>महिला उमेदवारांकरिता</u> :-

१) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिला साठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२) मागासवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग वि.जा(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या ३० टक्के आरक्षणासाठी क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी, व मुळ प्रमाणपत्र अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## ५) <u>खेळाडू उमेदवारांकरिता</u> :-

१) महाराष्ट्र शासन ,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,निर्णय क्रमांक रा.क्रि.घो/२००२/प्र.क्र६८/ क्रि.यु.से-२ दिनांक ३० एप्रिल २००५ नूसार पात्र खेळाडू उमेदवार.

२) खेळाडूसाठी आरक्षणाच्या पदाकरीता खेळाडूंनी राज्य अजिंक्यपद स्पर्धा मध्ये भाग घेतला आहे आणि उक्त शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानूसार पारितोषीके प्राप्त केलेली आहे अशा उमेदवारांनी शासन निर्णयानूसार अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र नमुना १ ते ४ मध्ये साक्षांकीत प्रत जोडावी. व असे मूळ प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे बंधनकारक रहील. प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून पडताळणी झालेनंतरच नियुक्ती देण्यात येईल.

३) खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/ कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूसाठी असलेले ५ टक्के आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५ टक्के आरक्षण लागू राहणार नाही.

४) इतर मागासवर्ग ,भ.ज (क,ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या खेळाडू सदस्यांनी खेळाडूसाठींच्या ५ टक्के आरक्षणासाठी क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबत मूळ प्रमाणपत्र अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

## ६) शुल्क (फी) :-

| पदांचे नांव | मागासवर्गीय उमेदवारांकरीता | खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता |
|---|---|---|
| तलाठी | रू. ७५/- | रू. १५०/- |

**१)** उमेदवाराने अर्जासोबत वरील प्रमाणे परीक्षा शुल्क (फी) राष्ट्रीयकृत बँकेचा/धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही स्वरूपात शुल्क(फी) स्वीकारली जाणार नाही. डीडी (डिमांड ड्राफ्ट) **जिल्हाधिकारी, लातूर** यांच्या नांवे असणे आवश्यक राहील, डीडी (डिमांड ड्राफ्ट) जिल्हाधिकारी, लातूर या नावाने नसेल तर तसेच विहीत शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**२)** माजी सैनिकांनी अर्जा सोबत आवेदन शुल्क भरण्याची सूट देण्यात आली आहे.

## ७) निवड पध्दती :-

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय दि०१.०१.२०१० नूसार तलाठी या पदासाठी निवड करतांना मुलाखत न घेता, फक्त लेखी परीक्षा घेण्यात येईल, व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्तेनूसार निवड करण्यात येईल.

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १९.१०.२००७ अन्वये लेखी परीक्षाचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता) १२वी च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुंणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

## ८) अर्ज कसा करावा :-

१) उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात ३० सें.मी. बाय २० सें.मी. आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एकाच बाजूला हस्तलिखीत / टंकलीखीत वा चक्रमुद्रीत करुन अर्ज करावा. उमेदवारांची अर्जातील माहिती / तपशिल सुस्पष्टपणे नमुद करावा, अर्जासोबत स्वत:चे नांव व पत्ता नमुद केलेला २४ सें.मी. बाय ११ सें.मी. आकाराचा रु.५/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

२) उमेदवाराने ओळखपत्रावरील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलीकडचे काळातील छायाचित्र आवेदनपत्रावर विहीत जागी स्वसाक्षांकीत करुन घट्ट चिकटवावे.

३) शैक्षणीक अर्हता, संगणक अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

४) जातीचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी तसेच उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) चे तत्व अनु.जाती / अनु.जमाती व्यतिरीक्त इतर सर्व मागास प्रवर्गाला लागु असल्याने उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१०-११ या वर्षातील नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.

५) समांतर आरक्षणातील उमेदवारांनी समांतर आरक्षणाबाबतच्या संबधीत प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अर्जासोबत जोडावी.

६) अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख व कार्यालयाचा पत्ता उमेदवारांने संपुर्ण भरलेला आपला अर्ज, शैक्षणीक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्राचे साक्षांकीत प्रतीसह विहीत नमुन्यात भरुन **मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर पिन कोड ४१३५३१** या पत्त्यावर **दिनांक:-१६/०५/२०११ पर्यत कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ०५-४५ वाजेपर्यंत)** पोहंचतील अशा बेताने समक्ष अथवा पोष्टाने पाठवावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, व कार्यालय जबाबदार राहाणार नाही. तसेच या संबधाने उमेदवारासमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाने विलंबाने प्राप्त झालेले लिफाफे उघडण्यांत येणार नाहीत.

७) अर्जाच्या पाकिटावर तलाठी पदासाठी अर्ज व सामाजीक (मागासवर्ग) आरक्षणानुसार प्रवर्ग नमुद करावा.

८) विहीत नमुन्यात नसलेले अर्ज, अर्जावर स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहीत शुल्काचे डीडी (डिमांड ड्राफ्ट) नसलेले अर्ज,चुकीच्या नावाने काढलेले डी.डी./धनादेश,विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेला व फोटो स्वसाक्षांकीत न केलेला अर्ज,वय, शैक्षणीक अर्हता, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत न जोडलेले अर्ज,विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, लहान कुटूंबाचे शपथपत्र न जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९) या जाहीरातीला अनुसरुन ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१०) छाननीअंती पात्र/अपात्र झालेल्या अर्जाच्या याद्या, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व या कार्यालयाच्या **Latur.nic.in. या** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परीक्षा लातूर येथे घेण्यात येईल, याबाबत परीक्षेचा दिनांक,वेळ, व परीक्षा केंद्र प्रवेशपत्राव्दारे लेखी कळविण्यांत येईल. तसेच लातूर जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल

११) काही प्रशासकीय अथवा तांत्रीक अडचण उदभवल्यास निवड स्थगीत किंवा रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समीतीस राहतील.

१२) उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यांत येईल.

१३) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे समजता येणार नाही.

१४) लेखी परीक्षेसाठी येण्याजाण्याचा खर्च स्वतः उमेदवाराने करावा लागेल.

१५)सदर जाहीरात व अर्जाचा नमूना जिल्हयाच्या संकेतस्थळावर (Website) वर उपलब्ध आहे.त्याचा पत्ता http://WWW.Latur.nic.in असा आहे.

**दिनांक :-२५/०४/२०११**
**स्थळ :- लातूर**

सही/-
**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी लातूर**

# अर्जाचा नमुना
## तलाठी भरती प्रक्रिया 2011

उमेदवाराचा अलीकडच्या काळातील स्व साक्षांकीत केलेल्या ओळखापत्राच्या आकाराचा फोटो

अर्जाचा नोंदणी क्रमांक

**प्रति,**

**मा.निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर**

**विषयः- तलाठी पदासाठी अर्ज..**

आपल्या कार्यालयाची जाहीरात दिनांक / /2011 ला अनुसरुन तलाठी या पदासाठी अर्ज करीत असुन माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. अर्जदाराचे संपुर्ण नाव (मराठीमध्ये) आडनावः ------------------------------------------
   स्वतःचे नावः ------------------------------------------
   वडीलाचे/पतीचे नाव : ------------------------------------------
2. पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ताः- ------------------------------------------------------------
   घर क्रमांकः -------------, गाव / शहरः------------------------
   पोष्टः ------------, तालूकाः------------- जिल्हाः ---------------- पिन कोडः -------------
   दुरध्वनी क्रमांक --------, मोबाईल क्रमांक ----------
3. जन्म दिनांक :- [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]
   दिनांक महिना वर्ष
4. जन्म दिनांक (अक्षरात):- ------------------------------------------------------------
5. दिनांक 16/05/2011 रोजी वय दिवस [ ] महिने [ ] वर्ष [ ]
6. राष्ट्रीयत्व :-
7. उमेदवार पुरुष अथवा स्त्री :- पुरुष / स्त्री
8. उमेदवार विवाहीत आहे की अविवाहीत :-

9. अर्जदाराची जात :- [ ]

10. जातीचा प्रवर्ग :- जातीचा प्रवर्ग खालील चौकोनात ✔ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

11. समांतर आरक्षणाचा प्रकारः-योग्य रकान्यात ✔ अशी खुण करा.(सोबत प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडली आहे)

| महिला | माजी सैनिक | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालीन उमेदवार | खेळाडू |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

12. अ) जातीचे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक :-
--------------------------------------------------------------------------------

ब) उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्यांचा हुद्दा व प्रमाणपत्र क्र. व दिनांक ---------------------------------------------------------

13. अ) अर्जदाराची शैक्षणीक पात्रता :-

| अ.क्र. | शैक्षणीक पात्रता | संस्थेचे/बोर्डाचे/विद्यापीठचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | गुणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

13. ब) इतर अर्हता तपशिल : 1)संगणक अर्हता ------------------------------------------
2)इतर अन्य शैक्षणीक अर्हता -----------------------------

14. अनुभव असल्यास अनुभवाचा कालावधी व कार्यालयाचे नाव :-

15. सेवायोजन कार्यालय नोंदणी क्रमांक व दिनांक (जिल्ह्यांसह) :-

16. महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय :- होय / नाही

17. अर्जदार स्वातंत्र्य सैनिकाचा पाल्य आहे काय (नामनिर्देशन पत्राची साक्षांकीत प्रत):- होय / नाही

18. अर्जदार अंशकालीन कर्मचारी आहे काय (जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयातील प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.) :- होय / नाही

19. अर्जदार अपंग आहे काय? असल्यास(अपंगाच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.):

:-होय/नाही

20. अर्जदार 1991 चे जनगणना कर्मचारी आहेत काय? (असल्यास साक्षांकीत प्रत) :- होय / नाही

21. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय :- होय / नाही

22. डी.डी.बाबत तपशिल.

| डी.डी क्रमांक | दिनांक | बँकेचे/शाखेचे नाव (गावाच्या नावासहीत) | रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

मी याद्वारे प्रमाणीत करतो / करते की, माझ्या माहितीनुसार वरील तपशिल सत्य आणि अचुक आहे. या माहितीतील कोणताही तपशिल चुकीचा / खोटा आढळल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल व माझेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

# (नमुना अ)

(नियम 4 पहा)

# प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती/कुमारी : ------------------------------------------------------------------- --- श्री. ------------------------------------------------------------------------------------------ ------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय --------------- वर्ष, राहणार ------------------ ---- या द्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

1. मी तलाठी या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.
2. मी विवाहीत/अविवाहीत आहे.
3. आज रोजी मला --------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------------- आहे.(असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)
4. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

**उमेदवारांची स्वाक्षरी व नाव**